महत्वाचे

आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,नाशिक.
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/१४/2019.
नाशिक. दिनांक :- 28/02/2019.

प्रति,

**म.अधिष्ठाता,**
**सर जे.जे.समुह रुग्णालय,**
मुंबई- 400 008.

विषय :- **वैद्यकिय तपासणीबाबत.**
(श्रीम.संगिता सिताराम ठाकरे. आरोग्य सेविका. प्रा.आ.केंद्र मनखेड ता.सुरगाणा)

**संदर्भ** :- कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक26/02/2019.

उपरोक्त विषयासंदर्भात कळविण्यांत येते की, श्रीमती संगिता सितराम ठाकरे. आरोग्य सेविका (म.) या प्राथमिक आरोग्य केंद्र, मनखेड ता.सुरगाणा येथे कार्यरत असुन गटाचे अहवालानुसार त्या दिनांक 01/06/2018 ते दि.8/10/2018 या कालावधीत रजेचे आवेदनपत्र न देता अनधिकृत गैरहजर राहील्या आहे. तथापी त्या दिनांक 9/10/2018 रोजी कामी हजर होण्यासाठी आल्या असता त्यांनी सदर कालावधीत त्या आजारी होत्या म्हणून वैद्यकिय प्रमाणपत्रासह रजा मंजूरीचा अर्ज सादर केला व हजरवृतांत सादर केला आहे.

श्रीमती ठाकरे यांनी रजा मिळणेकामी दिनांक 1/6/2018 ते 28/6/2018 या कालावधीचे वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र, पाटोदा ता.येवला यांचे प्रमाणपत्र सादर केले आहे व त्यावर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांची प्रतिस्वाक्षरी आहे. दि.29/6/2018 ते 28/7/2018 व दिनांक 28/7/2018 पासून 6 आठवडे तसेच 11/9/2018 पासून 30 दिवस या कालावधीचे उपजिल्हा रुग्णालय, निफाड येथील वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले आहे. हजर होतांना अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. सोबत सर्व प्रमाणपत्रांच्या झेराक्स प्रती आपल्या अवलोकनाकरीता सादर केल्या आहेत.

तथापी आपणास विनंती करण्यात येते की, श्रीमती ठाकरे हयांची वैद्यकीय दृष्टया तपासणी करुन श्रीमती ठाकरे यांनी सादर केलेले प्रमाणपत्र योग्य आहे किंवा कसे, तसेच प्रमाणपत्रांत दर्शविलेला आजार श्रीमती ठाकरे यांना आहे काय आणि हल्ली त्या आरोग्य सेविका पदांचे कामकाजाकरीता पात्र आहेत किंवा कसे या बाबतचे आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासहचे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळणेस विनंती आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, सुरगाणा,
द्वारा श्रीम. संगिता सिताराम ठाकरे. आरोग्य सेविका. प्रा.आ.केंद्र. मनखेड ता.सुरगाणा.
2/- आपणांस कळविणेत येते की. श्रीमती ठाकरे. आरोग्य सेविका प्रा.आ.केंद्र मनखेड ता.सुरगाणा यांना [illegible] वैद्यकिय तपासणीसाठी जे.जे.समुह रुग्णालये, मुंबई येथे हजर राहून वैद्यकिय प्रमाणपत्र अहवाल सादर करणेबाबत सूचना द्याव्यांत.
प्रत :- वैद्यकिय अधिकारी. प्राथमिक आरोग्य केंद्र. मनखेड ता.सुरगाणा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.